# इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया, पुणे सन २०१६-१७

## विशेष फेरी-५ प्रसिध्दी निवेदन

दि.२१.०९.२०१६.

पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील कनिष्ठ महाविद्यालयांचे इयत्ता ११वी शैक्षणिक वर्ष २०१६-१७ चे प्रवेश ऑनलाईन पध्दतीने होत आहेत.

विशेष फेरी-५ ची गुणवत्ता यादी गुरुवार दि २२.०९.२०१६ रोजी गुरुवार सकाळी ११.०० वाजता प्रसिध्द करण्यात येणार आहे. या यादीतील विद्यार्थ्यांनी प्रवेश वेळापत्रकानुसार गुरुवार दि. २२.०९.२०१६ व शुक्रवार दिनांक २३.०९.२०१६ सकाळी ११.०० ते ४.०० तसेच शनिवार दि.२४.०९.२०१६ रोजी सकाळी १०.०० ते १२.०० वाजेपर्यंत प्रवेश घ्यावेत.

विशेष फेरी -५ मधील प्रवेशाची माहिती पुढीलप्रमाणे :-

| अ. .क्र. | शाखा | एटीकेटी प्राप्त अर्ज | मागील व पुरवणी परीक्षेतील उत्तीर्ण विद्यार्थी अर्ज | एकुण अर्ज | एटीकेटी ॲलोकेशन | मागील व पुरवणी परीक्षेतील उत्तीर्ण विद्यार्थी ॲलोकेशन | एकुण ॲलोकेशन |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | कला (मराठी) | १५० | ११३ | २६३ | १५० | ११३ | २६३ |
| २ | कला (इंग्रजी) | ३३ | ५२ | ८५ | ३३ | ५२ | ८५ |
| ३ | कॉमर्स (मराठी) | ७६ | १४७ | २२३ | ७६ | १४७ | २२३ |
| ४ | कॉमर्स (इंग्रजी) | १०८ | ३९७ | ५०५ | ९२ | ३५९ | ४५१ |
| ५ | विज्ञान (इंग्रजी) | १० | २६२ | २७२ | १० | २६२ | २७२ |
| | एकुण | ३७७ | ९७१ | १३४८ | ३६१ | ९३३ | १२९४ |

विशेष फेरी-५ मधील ॲलोकेशन झालेल्या एटीकेटी ३६१ विद्यार्थ्यांपैकी पहिल्या पसंती क्रमांकाचे २१३ व दुस-या पसंतीक्रम-५१ विद्यार्थी व पुरवणी परीक्षा व पुर्वीच्या उत्तीर्ण एकुण ९३३ विद्यार्थ्यांपैकी ५०८ विद्यार्थ्यांना पहिल्या व १५४ विद्यार्थ्यांना दुस-या पसंती क्रमांकाचे कनिष्ठ महाविद्यालये मिळालेले आहेत.

### विशेष फेरी-५ मधील विद्यार्थ्यांसाठी सूचना :-

१) इ. ११वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेच्या **http://pune.fyjc.org.in** या संकेतस्थळावर आपला ऑनलाईन ॲप्लीकेशन फॉर्म क्रमांक टाकुन कोणते कॉलेज मिळाले आहे ते पाहावे.

२) विशेष फेरी-५ मधील विद्यार्थ्यांनी प्रवेश घेण्यासाठी माहिती पुस्तिकेत नमूद केल्याप्रमाणे मूळ कागदपत्रे महाविद्यालयात सादर करुन दिलेल्या वेळापत्रकानुसार प्रवेश निश्चित करावा. (गुरुवार दि. २२.०९.२०१६ व शुक्रवार दिनांक २३.०९.२०१६ सकाळी ११.०० ते ४.०० तसेच शनिवार दि.२४.०९.२०१६ रोजी

सकाळी १०.०० ते १२.०० वाजेपर्यंत प्रवेश घ्यावेत.) कोणत्याही परिस्थितीत वेळ वाढवून दिली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

३) इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेत सहभागी विद्यार्थ्यांसाठी प्रवेशाच्या पाच व पाच विशेष फे-या घेण्यात आलेल्या आहेत, विशेष फेरी-५ या फेरीत ॲलोकेशन मिळालेल्या विद्यार्थ्यांनी कनिष्ठ महाविद्यालयात आपला प्रवेश अंतिम करावा. प्रवेश निश्चित केलेल्या विद्यार्थ्यांच्या मुळ दाखल्याची नोंद महाविद्यालयांनी आपल्या जनरल रजिस्टर मध्ये करावी. व संपुर्ण शुल्क स्विकारुण प्रवेश अंतिम करावा.

४) विशेष फेरी-४ व ५ मधील विद्यार्थ्यांसाठी कनिष्ठ महाविद्यालयाने दर शनिवारी जादा तासिका घेवुन अभ्यासक्रम पुर्ण करुन घेण्यात यावा. तसेच सदर विद्यार्थ्यांचे परीक्षाबाबत अंतर्गत मूल्यमापन कनिष्ठ महाविद्यालयीन स्तरावर करण्यात यावे. सदर विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी.

५) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांचेकडील शासन निर्णय दि. १९.०९.२०१६ च्या शासन निर्णयानुसार कनिष्ठ महाविद्यालयाने जनरल रजिस्टर व दाखल्याच्या अद्ययावत करावी. तसेच एटीकेटी विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र जनरल रजिस्टर करुन त्यामध्ये अद्ययावत शासन निर्णयाप्रमाणे नोंदी कराव्यात.

सदरचे प्रसिध्दीपत्रक इ. ११वी ऑनलाईन केंद्रीय प्रवेश प्रक्रियेच्या **http://pune.fyjc.org.in** या संकेतस्थळावर व शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे या कार्यालयाच्या **www.dydepune.com** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(दिनकर टेमकर)
अध्यक्ष
इ.११ वी केंद्रीय प्रवेश नियंत्रण समिती
तथा
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे-१